डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
नाटयशास्त्र विभाग

दिनांक : १५/०२/२०१३

## वृत्त प्रकाशनार्थ

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाटयशास्त्र विभागाचा ३८ वा नाटयमहोत्सव दि.१८ फेब्रुवारी ते दि.०५ मार्च २०१३ या कालावधीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाटयगृहात सादर होत आहे. नाटयशास्त्र विभागाच्या परीक्षेचा हा महोत्सव एक भाग असतो आणि विद्यार्थ्यांची ही परीक्षा शहरातील रसिक प्रेक्षकांसमोरच होत असते. यावर्षीचा हा नाटय महोत्सव मराठवाडयात पडलेल्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर होत आहे. Show must go on या तत्वाला प्रमाण मानत होणा-या या नाटयमहोत्सवातील नाटयकृतींचे प्रयोग महाराष्ट्रभर करुन त्यातून विभागाच्या दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांसाठी निधी उभा करण्याचा संकल्प विभाग प्रमुख प्रा.डॉ.शशिकांत ब-हाणपूरकर यांनी केला आहे आणि त्यादृष्टीचे नियोजन नाटयशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी वर्ग करत आहे. यासाठी विभागास उच्च व तंत्रशिक्षण मंत्री मा.राजेश टोपे, पदवीधर मतदार संघाचे आमदार मा.सतिश चव्हाण आणि शिक्षक मतदार संघाचे आमदार मा.विक्रम काळे हे मदत करणार आहे. त्याचबरोबर मराठवाडयातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक पातळीवर कार्य करणा-या अग्रगण्य मान्यवरांशी विभाग संपर्क करत आहे. या उपक्रमास सर्व रसिक उत्तम प्रतिसाद देतील असा विभागाचा आत्मविश्वास आहे असेही प्रा.डॉ.शशिकांत ब-हाणपूरकर यांनी या नाटयमहोत्सवा संबंधीच्या पत्रकार परिषदेत प्रतिपादन केले.

‘प्रादेशिक अस्मितेचे भान ठेवत आंतरराष्ट्रीय पातळीवर योगदान देणारा नाटयशास्त्र विभाग’ अशी विभागाची ओळख आहे. यंदाच्या नाटयमहोत्सवाचे उद्‌घाटन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री राजेश टोपे यांच्या हस्ते येत्या मंगळवारी (दि.१८) सायंकाळी ६.३० वाजता होणार आहे. यावेळी प्रख्यात संगीतकार अवधूत गुप्ते, दिग्दर्शक राजेश शिखरे, अभिनेता राजीव खांडकेकर, आ.सतिश चव्हाण आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. महोत्सवाचा समारोप ज्येष्ठ नाटककार प्रेमानंद गज्वी, चित्रपट निर्माते नेहा गोखले आणि प्रशांत गोखले, आ.विक्रम काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत दि. ५ मार्च रोजी सायंकाळी होणार आहे. या दोन्ही कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ.विजय पांढरीपांडे हे राहणार आहेत.

**१४ नाटकांची मेजवानी :**

विद्यापीठाच्या नाटयगृहात हा महोत्सव रंगणार आहे. ‘लोकल टू ग्लोबल’ ही संकल्पना घेऊन विभाग दर्जेदार नाटकांचे सादरीकरण करीत आहे. यावेळी देखणी बायको दुस-याची (दि.२०), स्टेशन (दि.२१), अंधायुग (दि.२२), कथा खैरलांजीची (दि.२३), जुलूस (दि.२४), फूटपायरीचा सम्राट (दि.२५), तृतीय रत्न (दि.२६), शांतेचं कार्ट चालू आहे (दि.२७), अतिरेकी (दि.२८), झगडा (दि.०१), थँक्यू मिस्टर ग्लाड (दि.०२), पैशाला अनेक वाटा (दि.०३), पुन्हा एक गांधारी (दि.०४), आंबेडकरी जलसा (दि.०५) या नाटकांचे सादरीकरण होणार आहे. नाटयगृहात दररोज सायंकाळी ७.०० वा. प्रयोग सादर होतील. रसिकांनी नाटयमहोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभाग प्रमुख प्रा.डॉ.शशिकांत ब-हाणपूरकर यांनी केले आहे.